सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय अध्यापक महाविद्यालय (सी. टी. ई.), पनवेल

प्रशिक्षणात प्राविण्यम

# "स्वच्छता ही सेवा २०२५"




# उपक्रमांचा अहवाल

## दि. १७/०९/२०२५ ते ०२/१०/२०२५



महाराष्ट्र शासन

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

मुंबई पुणे जुना हायवे, एस. टी. स्टँडजवळ, पनवेल जि. रायगड – ४१०२०६
E mail: govt_bedcollege@rediffmail.com
Website: www.panvelbedcollege.org

Phone No. 022-27453000 Fax No. 022-27453000

जा.क्र./शाअमप/अहवाल/२०२५-२६/ दिनांक : १०/१०/२०२५

प्रति,
मा. विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग,
पनवेल, जि. रायगड.

विषय – **स्वच्छता ही सेवा अभियान** २०२५ या उपक्रमाचा अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ – शासनाची प्रेसनोट.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयाचे अनुषंगाने आपणांस सादर करणेत येते की, **स्वच्छता ही सेवा अभियान** २०२५ शासनाने राबविलेल्या उपक्रमांतर्गत प्रस्तुत महाविद्यालयात दि. १७/०९/२०२५ ते ०३/१०/२०२५ या कालावधीत विविध उपक्रम आयोजित केले. सदर कालावधीतील सर्व कार्यक्रमांचे अहवाल एकत्रित करून छायाचित्रांसह आपणांस सादर करीत आहोत, स्वीकार व्हावा ही विनंती.

कळावे,
आपली विश्वासू
RBhosle
प्राचार्य
(डॉ. रमा अ. भोसले)
शा. अ. म. पनवेल

Government College of Education Panvel

# Press Note

## उच्च शिक्षण संचालनालय, पुणे

**विकसित भारत २०४७ या केंद्र सरकारच्या उपक्रमांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन - राष्ट्रीय सेवा योजना माध्यमातून दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत..**

विकसित भारत २०४७ हा भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापूर्वी विकसित राष्ट्र बनण्याच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या उद्देशाने एक उपक्रम आहे. २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याच्या १०० व्या वर्षाच्या जवळ येत असताना, हा उपक्रम व्यापक आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि प्रशासनिक क्षेत्रात प्रयत्नांना एकत्रित करण्याचा प्रयत्न करतो. ही संकल्पना भारताला एक आघाडीची जागतिक शक्ती म्हणून जगासमोर आणण्याची क्षमता दर्शविते. तरुणांमध्ये हा विचार पुढे नेण्यासाठी **"विकसित भारत राजदूत - युवा कनेक्ट"** कार्यक्रम भारत सरकार तर्फे आयोजित केला जाणार असून, याचा उद्देश भारताच्या विकासात्मक परिवर्तनात तरुणांचा सहभाग आणि नेतृत्व वाढवणे हा आहे.या अनुषंगाने राज्यामध्ये या संदर्भात विविध उपक्रम / कार्यक्रम आयोजित करून मा. पंतप्रधानांच्या विकसित भारताच्या दृष्टिकोनाला जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

या निमित्ताने उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यातर्फे दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या दरम्यान **"विकसित भारत संवाद - online व्याख्यानमाला"** आयोजित करण्यात येणार असून या व्याख्यानमालेत राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्ती विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहे.

तसेच राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यातर्फे राज्यातील विद्यापीठे / महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक माध्यमातून खालील प्रमाणे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

- रक्तदान अमृतमहोत्सव अंतर्गत सर्व विद्यापीठ व महाविद्यालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करणे
- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छयोत्सव हा उपक्रम राबविणे
- सफाई मित्र सुरक्षा शिबिर अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करणे
- Clean Green उत्सव अंतर्गत Zero Waste Management & Used Eco-Friendly Utensils Programme
- विकसित भारत @ २०४७ मध्ये युवकांचा सहभाग याबाबत व्याख्यान आयोजित करणे
- NSS स्थापना दिवस २४ सप्टेंबर, २०२५ निमित्त मा. पंतप्रधान यांच्या नैतृत्वाखाली देशाची प्रगती व पुढील वाटचाल या संदर्भात युवकांशी संवाद कार्यक्रम आयोजित करणे.
- **"एक दिन, एक घंटा, एक साथ"** राष्ट्र स्वच्छता अभियान आयोजित करणे
- जागतिक पर्यावरण आरोग्य दिवसानिमित्त जनजागृती करणे

- विश्व पर्यटन दिवस निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांबाबत व त्यांनी निर्माण केलेल्या हिंदवी स्वराज्याबाबत व्याख्यान आयोजित करणे
- शहीद भगतसिंह यांच्या जयंतीनिमित्त युवकांमध्ये देशभक्ती, साहस व त्यांचे आदर्शाचे स्मरण करण्यासाठी व्याख्यान आयोजित करणे.
- जागतिक हृदय दिवस निमित्त पोषण आहार / अनेमिया / हृदय रोग / मधुमेह / उच्च रक्तदाब या बद्दल कार्यशाळा / निबंध / पथनाट्य या सारखे उपक्रम आयोजित करणे
- सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम आयोजित करणे

युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकार यांच्या निर्देशानुसार याच कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना तर्फे संपूर्ण राज्यभरामध्ये **"स्वच्छता ही सेवा" अभियान २०२५** हा उपक्रम विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक यांचामार्फत राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत सार्वजनिक स्वच्छता, सफाई मित्र सुरक्षा शिबीर, Clean Green उत्सव, स्वच्छ सुजल गाव, स्वच्छ आरोग्यदायी स्ट्रीट फूड इत्यादी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच दिनांक २५ सप्टेंबर, २०२५ रोजी राष्ट्रीय स्वच्छता अभियान अंतर्गत सर्व नागरिकांना हाताची साखळी करून संपूर्ण देशभरात आणि राज्यातही श्रमदान अंतर्गत **"एक दिन, एक घंटा, एक साथ"** हे एक तासाचे अभियान राबविले जाणार आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP) च्या मार्गदर्शक तत्वानुसार पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी AEDP संदर्भात सर्व विद्यापीठांमध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# विकसित भारत संवाद

## ऑनलाईन व्याख्यानमाला

दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५
वेळ – दुपारी ५:०० वा.

Zoom Link for Online Session
https://zoom.us/j/95354520672



श्री इंद्रनील नाईक
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य



श्री. चंद्रकांत पाटील
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य

# व्याख्यानमाला वेळापत्रक

| वक्ते | | विषय | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| **एअर चीफ मार्शल श्री. विवेक राम चौधरी,** (से. नि.), (PVSM AVSM VM ADC) |  | संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता | १७.०९.२०२५ दु. ५:०० वा. |
| **Ambassador श्रीमती लक्ष्मी पुरी,** (से. नि.), नवी दिल्ली |  | भारतातील लोकशाहीचे पुनर्जागरण : मोदी युगाची क्रांती | १९.०९.२०२५ दु. ५:०० वा. |
| **प्रा. डॉ. मनीष दाभाडे,** जवाहरलाल नेहरू केंद्रीय विद्यापीठ, नवी दिल्ली |  | परराष्ट्र धोरण आणि विकसित भारत | २३.०९.२०२५ दु. ५:०० वा. |
| **श्री. आशिष चांदोरकर,** प्रथितयश लेखक व अर्थकारणाचे अभ्यासक, जिनिव्हा, ऑस्ट्रिया |  | मोदी कालखंडातील आर्थिक सुधारणा आणि विकसित भारत | २६.०९.२०२५ दु. ५:०० वा. |
| **डॉ. शान्तिश्री पंडित,** मा. कुलगुरु, जवाहरलाल नेहरू केंद्रीय विद्यापीठ , नवी दिल्ली |  | शिक्षणातून कौशल्य विकास : विकसित भारताचा आधार | २९.०९.२०२५ दु. ५:०० वा. |

**मार्गदर्शक**

**श्री. बी. वेणुगोपाल रेड्डी, भाप्रसे**

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**निमंत्रक**

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

संचालक, उच्च शिक्षण

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

### स्वच्छता ही सेवा अभियान २०२५

### कालावधी (१७/०९/२०२५ ते ०२/१०/२०२५)

| अ.क्र. | दिनांक | वेळ | उपक्रमाचे नाव | विषय | मार्गदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| १ | १७/९/२०२५ | ३ ते ५ | १.पथनाट्य<br>२.रॅली | 'रक्तदान श्रेष्ठ दान' | डॉ. मोरे एन. एम. |
| २ | १८/९/२०२५ | ३ ते ५ | स्वच्छता उत्सव | महाविद्यालय परिसर स्वच्छता | डॉ. मोरे एन. एम. |
| ३ | १८/९/२०२५ | ४ ते ५ | आरोग्य तपासणी शिबिर | सफाई मित्र | डॉ. डोणे यु. एम. |
| ४ | २०/९/२०२५ | ३ ते ५ | वेस्ट मॅनेजमेंट | कपडे की थैली मेरी सहेली | डॉ. डोणे यु. एम. |
| ५ | २३/९/२०२५ | ३ ते ५ | व्याख्यान | १. सरदार वल्लभभाई पटेल.<br>२. विकसित भारत | प्रा. दडपे बी. एस. |
| ६ | २४/९/२०२५ | ३ ते ४ | युवकांशी संवाद | स्वच्छतेमध्ये योगदान | डॉ. मोरे एन. एम. |
| ७ | २४/९/२०२५ | ४ ते ५ | व्याख्यान | झिरो वेस्ट मॅनेजमेंट | डॉ. डोणे यु. एम. |
| ८ | २५/९/२०२५ | ३ ते ५ | व्याख्यान<br>एक दिन एक घंटा एक साथ | १. पंडित दीनदयाळ उपाध्याय<br>२. शासनाच्या विविध योजना | डॉ. सुभेदार पी पी |
| ९ | २६/९/२०२५ | ३ ते ५ | व्याख्यान:जागतिक पर्यावरण आरोग्य दिन | १. आरोग्याची काळजी<br>२. योग भारतीय आहार विहार | डॉ. डोणे यु. एम. |
| १० | २७/९/२०२५ | ३ ते ५ | १. हस्तपुस्तिका<br>२. विश्व पर्यटन दिन व्याख्यान | १. गडकिल्ल्यांवर हस्तपुस्तिका<br>२. गडकिल्ले, हिंदवी स्वराज्य व्याख्यान | प्रा. दडपे बी. एस. |
| ११ | २९/९/२०२५ | ३ ते ५ | १. शहीद भगतसिंग जयंती<br>२. ग्रंथ परीक्षण<br>३. निबंध स्पर्धा | १. व्याख्यान<br>२. माझा साक्षात्कारी हृदयरोग – ग्रंथ परीक्षण<br>३. आरोग्य विषयक विषयावर निबंध स्पर्धा | प्रा. दडपे बी. एस. |
| १२ | ३/१०/२०२५ | ११ ते १ | म. गांधी जयंती सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता कार्यक्रम | एस. टी. स्टॅंडवर स्वच्छता अभियान | डॉ. मोरे एन. एम. |

**१३.सर्वांनी विकसित भारत संवाद ऑनलाइन व्याख्यानमाला १७ सप्टेंबर ते दोन ऑक्टोबर २०२५ मध्ये सहभागी होणे.**

**व्याख्यानमालेची वेळ - दुपारी ०५:०० वाजता**

RBhosle

**Principal**
Government College of Education (C.T.E.)
Panvel, Dist. Raigad - 410 206.

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## “स्वच्छता ही सेवा अभियान २०२५” अंतर्गत रक्तदान विषयक पथनाट्य

“स्वच्छता ही सेवा २०२५” या राष्ट्रीय अभियानाच्या निमित्ताने शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे समाजहिताचे विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांमध्ये रक्तदान या महत्वपूर्ण विषयावर आधारित पथनाट्य सादर करण्यात आले. हा कार्यक्रम दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालय परिसरात मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते झाले. उद्घाटनावेळी त्यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करताना समाजातील प्रत्येक तरुणाने या पवित्र कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. हे पथनाट्य प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आले. पथनाट्यात बी.एड. द्वितीय वर्षातील छात्राध्यापक –श्रीमती रश्मी नाडकर्णी, श्रीमती अनघा म्हात्रे, श्रीमती मोहिनी भगत, श्रीमती मृणाली कचरे, श्रीमती प्रीती सकपाळ, श्रीमती उषा चौधरी, श्रीमती भारतीय चौधरी, श्री श्रीराम फुफाणे, श्री सचिन श्रीरामे व श्री जॉकी वाघमारे – यांनी उत्कृष्ट अभिनय केला.

या पथनाट्यातून रक्तदानाचे वैद्यकीय, सामाजिक आणि मानवी पैलू समोर आणले गेले. एखाद्या अपघातग्रस्त किंवा शस्त्रक्रियाग्रस्त रुग्णाला रक्तदान किती महत्वाचे ठरते, हे वास्तववादी प्रसंगातून दाखवले गेले. तसेच समाजामध्ये असलेल्या रक्तदानासंबंधी गैरसमज – जसे की रक्तदानाने आरोग्यावर विपरित परिणाम होतो – हे दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रभावी संवाद, आकर्षक सादरीकरण आणि भावनाप्रधान प्रसंगांमुळे प्रेक्षकांच्या मनावर या नाटकाचा ठसा उमटला.

पथनाट्याच्या शेवटी प्राचार्या डॉ. भोसले यांनी सर्व छात्राध्यापकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. त्यांनी तरुण पिढीने केवळ शिक्षणातच नव्हे तर समाजोपयोगी कार्यातही सक्रिय भूमिका पार पाडावी, असे सांगितले. एकूणच, या पथनाट्यामुळे रक्तदानाविषयी समाजामध्ये प्रेरणा व जागृती निर्माण झाली. तसेच “स्वच्छता ही सेवा” अभियानाला कलात्मक माध्यमातून समाजोपयोगी संदेश देण्याची संधी मिळाली.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल**


## “स्वच्छता ही सेवा 2025”, उपक्रमांतर्गत “रक्तदान हेच श्रेष्ठदान”
















**समाजामध्ये रक्तदानाविषयी जागरूकता निर्माण करणे हेतू “रक्तदान हेच श्रेष्ठदान” याविषयी पथनाट्य सादर करताना द्वितीय वर्ष छात्राध्यापक.**

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## "स्वच्छता ही सेवा अभियान २०२५" अंतर्गत रक्तदान जनजागृती रॅली

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे "स्वच्छता ही सेवा २०२५" या राष्ट्रीय अभियानाच्या अनुषंगाने समाजहितासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांपैकी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे रक्तदान जनजागृती रॅली. हा कार्यक्रम दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्राचार्या मॅडमनी उद्घाटन प्रसंगी रक्तदानाचे सामाजिक आणि वैद्यकीय महत्त्व अधोरेखित केले. तसेच "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" या संदेशाचे गांभीर्य समजावून सांगितले. रॅलीचे आयोजन महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

रॅलीत बी.एड. द्वितीय वर्षातील सर्व छात्राध्यापक उत्साहाने सहभागी झाले. रॅलीदरम्यान छात्राध्यापकांनी हातात आकर्षक आणि प्रभावी फलक, पोस्टर्स व घोषवाक्ये धरून रक्तदानाविषयी समाजजागृती केली. "रक्तदान हेच श्रेष्ठ दान", "एका थेंबाने वाचते प्राण", "तुमच्या रक्ताने मिळेल कोणाला जीवनदान" अशी प्रभावी ब्रीदवाक्ये नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती.

रॅली महाविद्यालय परिसरातून सुरू होऊन पनवेल शहरातील मुख्य रस्त्यांवरून निघाली. रस्त्यावर नागरिकांनीही या रॅलीचे स्वागत केले व रक्तदानाविषयी जागरूकता निर्माण झाल्याचे समाधान व्यक्त केले. रॅलीनंतर आयोजित केलेल्या लघुसभेत मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक केले. त्यांनी तरुण पिढीने समाजातील सकारात्मक बदल घडविण्यासाठी नेहमीच अशा सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

एकूणच, या रॅलीमुळे रक्तदानासंबंधीची उदासीनता व गैरसमज दूर होऊन रक्तदान हा प्रत्येक जबाबदार नागरिकाचा सामाजिक कर्तव्यभाग आहे, हा संदेश प्रभावीपणे पोहोचला. तसेच "स्वच्छता ही सेवा" अभियानाला एक समाजोपयोगी आणि जनजागृतीपर दिशा लाभली.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल**

## “स्वच्छता ही सेवा 2025” उपक्रमांतर्गत “रक्तदान हेच श्रेष्ठदान”




“स्वच्छता ही सेवा अभियान 2025 अंतर्गत “रक्तदान हेच श्रेष्ठदान” जनजागृती रॅलीमध्ये सहभागी द्वितीय वर्ष छात्राध्यापक




रक्तदान हेच श्रेष्ठदान जनजागृती रॅलीमध्ये उपस्थित प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापक वृंद.







रक्तदानाविषयी जन जागृती करणे हेतू विविध ब्रीदवाक्यांच्या सहाय्याने घोषणा देत रॅलीमध्ये सहभागी द्वितीय वर्ष छात्राध्यापक






छात्राध्यापकांनी रॅली दरम्यानतयार केलेले आकर्षक व प्रभावी पोस्टर्स फलक आणि ब्रीदवाक्य

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## सफाई मित्र सुरक्षा आरोग्य तपासणी शिबिर

## दिनांक – १८/०९/२०२५

स्वच्छता ही सेवा अभियान २०२५ अंतर्गत दिनांक १८/०९/२०२५ रोजी सफाई मित्र सुरक्षा शिबिर अंतर्गत शासकीय अध्यापक महाविद्यालयामध्ये सफाई मित्र सुरक्षा आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. रमा भोसले मॅडम यांनी केले. या शिबिराचा लाभ महाविद्यालयातील कर्मचारी, सफाई कामगार तसेच परिसरातील बांधकाम कामगारांनी लाभ घेतला. यामध्ये एकूण २५ कर्मचारी व कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये कर्मचारी व कामगारांचे रक्तदाब आणि सामान्य तपासणी, सामान्य आरोग्य सल्ला इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. शिबिरामध्ये शासकीय अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहातील नर्सिंग च्या विद्यार्थिनी श्रीम. नयना आर्डेकर, श्रीम. पल्लवी यादव, श्रीम. प्रणाली ठाकूर, श्रीम. सदिच्छा काकड इत्यादींनी आरोग्य तपासणी केली. या शिबिराचे आयोजन प्रा. डॉ. उज्वला डोणे मॅडम यांनी केले.













GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
Shivaji Nagar, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.989084° Long 73.116945°
18/09/2025 03:40 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
X4q8+fqc, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.989024° Long 73.116963°
18/09/2025 03:40 PM GMT +05:30
Google

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## "स्वच्छता ही सेवा अभियान २०२५ "

## पुष्प दुसरे

## स्वछता आभिययान

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे "स्वच्छता ही सेवा २०२५" या राष्ट्रीय अभियानाच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन दिनांक १७/०९ /२०२५ ते ३/०९/२०२५ दरम्यान करण्यात आले. या अनुषंगाने दिनांक १८/०९/२०२५ रोजी महाविद्यालयामार्फत "स्वछता आभिययान" याचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या माननीय डॉ. रमा भोसले मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वृंद तसेच बी.एड. द्वितीय वर्षाचे छात्राध्यापक उपस्थित होते.


या स्वछता अभियानात बी.एड. द्वितीय वर्षातील छात्राध्यापक उपस्थिती दर्शवली आणि सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांनी स्वछता आभिययान संदर्भात माहिती सांगितली. या अभियानाच्या आयोजिका डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली अभियानाला सुरुवात केली. सर्व प्राध्यापक वृंद यांच्या देखरेखेखाली बी.एड. द्वितीय वर्षातील छात्राध्यापक यांनी कामाला सुरुवात केली.

या अभियाना अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसराची स्वछता केली गेली. बी.एड. द्वितीय वर्षातील छात्राध्यापक यांनी संपूर्ण परिसराची स्वछता करण्यात आली.

अभियानाच्या शेवटी मा. प्राचार्या डॉ. भोसले यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले एकूणच, या उपक्रमामुळे स्वछता अभियानाला चालना मिळाली तसेच "स्वच्छता ही सेवा" या अभियानाला समाजोपयोगी दिशा लाभली.

### शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## स्वछता आभिययान




स्वछता अभियानाची भितिपत्रिका




स्वछता अभियानाचे उद्घाटन करताना
मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम




स्वछता करण्यापूर्वी मा. प्राचार्य व प्राध्यापक
छात्राध्यापकाना मार्गदर्शन करताना




स्वछता करताना बी. एड. चे छात्राध्यापक




स्वछता करण्यापूर्वी चा परिसर




स्वछता केल्यानंतरचा परिसर

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## नालंदा कुल

## “स्वच्छता ही सेवा अभियान २०२५”

## व्याख्यानमाला

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे मंगळवार दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी स्वच्छता ही सेवा अभियाना अंतर्गत **लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे संस्थान विलीनीकरण यासाठीचे योगदान आणि विकसित भारत २०४७** यांवर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या सन्माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी भूषवले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका बिजली दडपे यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मार्गदर्शक प्राध्यापक बिजली दडपे यांनी केले. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे संस्थान विलीनीकरण यासाठीचे योगदान आणि विकसित भारत २०४७ या दोहोंवरती द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती. तनुश्री आठवले यांनी व्याख्यान केले. श्रीमती. तनुश्री आठवले यांनी 'स्वातंत्र्यासाठी प्राण त्यागणाऱ्या देशभक्तांचे बलिदान आपण विसरता कामा नये' असे त्यांच्या व्याख्यानात सांगितले. तसेच विकसित भारत २०४७ यावर श्री. रोहन भोईर यांनी व्याख्यान केले. श्री. रोहन भोईर यांनी आपल्या व्याख्यानातून भारत विविध क्षेत्रात प्रगती करत विकसनशील पाऊल पुढे टाकत असल्याचे सांगितले.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी अध्यक्षीय मनोगतातून स्वातंत्र्याची पार्श्वभूमी सांगत सद्यस्थितीची डोळस चिकित्सा करण्याचे आव्हान युवा छात्राध्यापकांना केले. कार्यक्रमाचे

सूत्रसंचालन व आभार प्रकटीकरण श्रीमती. स्मितल कुरूप यांनी केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने झाली.







महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले आणि महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका बिजली दडपे दीपप्रज्वलन करताना




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राध्यापिका बिजली दडपे




महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले अध्यक्षीय मनोगत करताना








कार्यक्रमाला लाभलेले व्याख्यानकर्ता द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती. तनुश्री आठवले आणि श्री. रोहन भोईर व्याख्यान सादर करताना




व्याख्यानमालेचा आस्वाद घेताना द्वितीय वर्ष छात्राध्यापक



# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे

- 'स्वच्छता ही सेवा अभियान २०२५' अंतर्गत
- 'युवकांशी संवाद' कार्यक्रम संपन्न

## <u>अहवाल</u>

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ रोजी बी.एड्. द्वितीय वर्ष (२०२४-२६) च्या विद्यार्थ्यांसाठी "स्वच्छता ही सेवा अभियान २०२५" अंतर्गत "युवकांशी संवाद" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या परिसरात दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या शुभहस्ते युवकांशी संवाद या कार्यक्रमाचे फित सोडून उद्घाटन झाले .

यानंतर स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये कार्यक्रमाच्या आयोजक प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले . तसेच, बी.एड्. द्वितीय वर्षाच्या छात्राध्यापकांनी सर्व प्राध्यापकांचे स्वागत केले.

त्यानंतर 23 - 09 - 2025 रोजी पनवेल येथील चांगु काना ठाकूर विद्यालय पालकांसाठी आयोजित केलेल्या पुष्पगुच्छ तयार करणे या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या छात्राध्यापक श्रीमती. सोनाली अशोक शिरसाठ यांनी या स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केल्या बद्दल त्यांना मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. याबाबत प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांनी सोनाली शिरसाट मॅडम यांचा सन्मान केला. महाविद्यालयाच्या प्राचार्य माननीय डॉ. रमा भोसले मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश युवकांशी संवाद साधणे हा असल्याने, सर्व छात्राध्यापकांनी *"स्वच्छता ही सेवा" या विषयावर गटचर्चेत* सहभाग घेतला. गटचर्चेनंतर, सर्व गटप्रमुखांनी त्यांचे विचार आणि मनोगत सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी द्वितीय वर्ष छात्र अध्यापक श्रीमती. स्मितल कुरूप मॅडम यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्त केले. व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी, *श्रीमती. रुणाली कचरे* यांनी आभार प्रदर्शन केले. आणि श्रीमती. प्रिती सकपाळ यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले व कार्यक्रम संपन्न झाला.



कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.रमा भोसले यांच्या हस्ते.



प्राचार्य डॉ रमा भोसले यांचे स्वागत.



प्रा. बिजली दडपे मॅडम यांचे स्वागत.



प्रा.डॉ नीलिमा मोरे यांचे स्वागत



सूत्रसंचालन करताना प्रीती सकपाळ



प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ रमा भोसले मॅडम.



गटचर्चा



गटचर्चा



अध्यक्षीय मनोगत स्मितल कुरुप.




आभार प्रकटीकरण



शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल.
बी.एड.द्वितीय वर्ष २०२४-२६
स्वच्छता ही सेवा अभियान २०२५
" युवकांशी संवाद"
कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| सरस्वती पूजन | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले व सर्व प्राध्यापक वृंद |
| मा. प्राचार्य स्वागत | प्रा. डॉ. नीलिमा मोरे |
| सर्व प्राध्यापकांचे स्वागत | बी. एड.द्वितीय वर्ष छात्राध्यापक |
| सर्व छात्राध्यापक गटचर्चा | बी.एड.द्वितीय वर्ष सर्व छात्राध्यापक |
| गटप्रमुखांचे मनोगत | सर्व गटप्रमुख |
| अध्यक्षीय मनोगत | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| सूत्रसंचालन | श्रीमती. प्रीती सकपाळ |
| आभार | श्रीमती. रुनाली कचरे |
| फोटोग्राफी | श्री.श्रीराम फुफ्फाने |
| व्हिडिओ ग्राफी | श्री. आकाश राठोड |

दिनांक २४/९/२०२५
वेळ : दुपारी ०३ ते ०४
स्थळ -सरस्वती कक्ष

कार्यक्रम पत्रिका



शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल
बी. एड. वर्ष २०२४-२६
" स्वच्छता ही सेवा अभियान २०२५ "
युवकांशी संवाद
निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, **दिनांक- २४ सप्टेंबर, २०२५** रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे **स्वच्छता ही सेवा अभियान २०२५ कार्यक्रमांतर्गत युवकांशी संवाद** आयोजित करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

आयोजक
मा. प्रा. डॉ . नीलिमा मोरे

अध्यक्ष
मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले

प्रमुख उपस्थिती
मा. प्रा. बिजली दडपे
मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार
मा. प्रा. डॉ. उज्वला डोणे

स्थळ : सरस्वती कक्ष
वेळ : दुपारी ३.०० ते ४.००

निमंत्रण पत्रिका

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## “स्वच्छता ही सेवा अभियान २०२५”

## Power Point Presentation

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे बुधवार दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी स्वच्छता ही सेवा अभियाना अंतर्गत **शून्य कचरा व्यवस्थापन** यावर पावर पॉइंट प्रेझेंटेशन आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या सन्माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी भूषवले. कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापिका उज्ज्वला डोणे यांनी केले.


कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली. द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती. अनघा म्हात्रे, श्रीमती. स्मितल कुरूप आणि श्री. महेंद्र वाघ यांनी शून्य कचरा व्यवस्थापन यावर पावर पॉइंट प्रेझेंटेशनचे सादरीकरण करून शून्य कचरा व्यवस्थापनाची संकल्पना, प्रक्रिया आणि त्याचे महत्त्व व परिणाम विशद केले.

कार्यक्रमाच्या मार्गदर्शक प्राध्यापक डॉ. उज्ज्वला डोणे मॅडम यांनी थोडक्यात शून्य कचरा व्यवस्थापनाचा आढावा घेत कार्यक्रमाची सांगता केली.


Government College of Education (CTE), Panvel
SWACHHATA HI SEVA ABHIYAN 2025
S.Y.B.Ed Student Presentation
SWACHHATA HI SEVA 2025
Subject : Zero Waste Management
1) Miss. Anagha Mhatre
2) Miss. Smital Kurup
3) Mahendra Wagh
Guide
Assistant Professor
Dr. Ujwala Done
Date : 24 September, 2025
Chair Person
Principal
Dr. Raamaa Bhoslay
GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
Old Mumbai Pune Highway Nh 48, Station Rd, Next To S.t. Bus Depot, Opp. Dr. Babasaheb Ambedkar Statue, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.988908° Long 73.116689°
24/09/2025 04:54 PM GMT +05:30
Google


Zero Wast Management
GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
Old Mumbai Pune Highway Nh 48, Station Rd, Next To S.t. Bus Depot, Opp. Dr. Babasaheb Ambedkar Statue, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.988912° Long 73.11669°
24/09/2025 04:45 PM GMT +05:30
Google


शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल
UNDERSTANDING ZERO WASTE
GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
Old Mumbai Pune Highway Nh 48, Station Rd, Next To S.t. Bus Depot, Opp. Dr. Babasaheb Ambedkar Statue, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.988893° Long 73.116693°
24/09/2025 04:32 PM GMT +05:30
Google


शून्य कचरा व्यवस्थापन
GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
Old Mumbai Pune Highway Nh 48, Station Rd, Next To S.t. Bus Depot, Opp. Dr. Babasaheb Ambedkar Statue, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.988913° Long 73.116693°
24/09/2025 04:37 PM GMT +05:30
Google

# अहवाल

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## स्वच्छता ही सेवा अभियान – २०२५ अंतर्गत व्याख्यानमाला

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी "स्वच्छता ही सेवा अभियान – २०२५" अंतर्गत "पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव" निमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी भूषविले. कार्यक्रमाचे आयोजन व व्यवस्थापन मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले.

कार्यक्रमाचा औपचारिक प्रारंभ दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाले. या विधीत मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले, सन्माननीय अतिथी तसेच संपूर्ण प्राध्यापकवृंद उपस्थित होते. या विधीने कार्यक्रमाला आध्यात्मिक व औपचारिक वातावरण प्रदान केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांचे स्वागत प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांनी केले. तसेच कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले विशेष अतिथी मा. श्री. दयानंद सिताराम मोकल यांचा सत्कार व अभिवादन मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. या स्वागतसोहळ्याने कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथी परिचय मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांनी दिले. त्यांनी व्याख्यानमालेचे उद्देश, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनकार्याचे महत्त्व व एकात्म मानव दर्शनाची तात्त्विक महती स्पष्ट केली. व्याख्यानमालेत श्रीमती वर्षा आतकर यांनी "पंडित दीनदयाळ उपाध्याय" यांचे "एकात्म मानव दर्शन सर्वांचा विचार सर्वांचा कल्याण" या विषयावर सखोल व्याख्यान सादर केले. त्यांनी उपाध्याय यांच्या जीवनातील विचार, कार्यशैली, नैतिक मूल्ये आणि समाजसेवेसाठी त्यांचे योगदान यावर प्रकाश टाकला. व्याख्यानादरम्यान त्यांनी उपस्थितांना प्रेरणा दिली की समाजहितासाठी कार्य करताना स्वच्छता, नैतिक मूल्ये आणि समाजकल्याण यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

तदनंतर कार्यक्रमांमध्ये उपस्थित लहान विद्यार्थी सार्थक म्हात्रे याने भारत देशावर आधारित एका विशेष प्रेरणादायी प्रार्थनेने कार्यक्रमाला एक उत्साहाचे प्रसन्न असे रूप दिले.  मा. श्री. दयानंद सिताराम मोकल यांनी शासनाच्या विविध योजनांचा सविस्तर परिचय दिला. त्यांनी समाज कल्याणासाठी चालविल्या जाणाऱ्या योजनांचे उद्देश, लाभार्थी व कार्यप्रणाली याबाबत माहिती दिली. त्यांच्या सविस्तर मार्गदर्शनामुळे प्रशिक्षणार्थी आणि प्राध्यापक वर्ग शासनाच्या योजनांविषयी जागरूक झाला व त्यांचा अभ्यासात्मक दृष्टिकोन विस्तृत झाला. कार्यक्रमात द्वितीय वर्ष बी. एड् च्या छात्राध्यापकांनी "एकात्म मानव दर्शन – सर्वांचा विचार, सर्वांचे कल्याण" या विषयावर पथनाट्य सादर केले. हा नाट्य सादरीकरण प्रभावी संवाद, सुबोध अभिनय व सुसंगत कृतीमुळे अत्यंत प्रभावशाली ठरले. यामुळे उपस्थित प्रेक्षकांनी नाट्याद्वारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या तत्वज्ञानाचे मूर्त रूप पाहिले.

कार्यक्रमाच्या शेवटी मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. त्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले व विद्यार्थ्यांना एकात्म मानवदर्शनाचा आदर्श जीवनात अवलंब करण्याचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आभार काजल पवार यांनी व्यक्त केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन रोहन भोईर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत आणि करण्यात आली.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल**

## "स्वच्छता ही सेवा 2025" उपक्रमांतर्गत "व्याख्यानमाला "




**"स्वच्छता ही सेवा अभियान 2025 अंतर्गत "व्याख्यानमाला" या कार्यक्रमांमध्ये सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन करताना मा. प्राचार्य मा. अतिथी तसेच सर्व प्राध्यापक वृंद.**




**कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ . रमा भोसले यांचे स्वागत करताना मा. डॉ. नीलिमा मोरे**




**कार्यक्रमाचा हेतू व अतिथी परिचय आपल्या प्रास्ताविकात कथन करताना मा. डॉ. निलिमा मोरे**




**कार्यक्रमासाठी उपस्थित विशेष अतिथी मा. दयानंद सिताराम मोकल यांचे स्वागत आणि सत्कार करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले**




**पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे "एकात्म मानव दर्शन या संकल्पनेवर आधारित व्याख्यान देताना श्रीमती वर्षा आतकर**





**भारत देशावर आधारित प्रेरणादायी प्रार्थनेचे गायन करताना सार्थक म्हात्रे.**




राज्यशासनाच्या विविध योजनांवर मार्गदर्शन करताना मा. दयानंद सिताराम मोकल.




कार्यक्रमामध्ये अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले.







"एकात्म मानव दर्शन -सर्वांचा विचार सर्वांचे कल्याण" या विषयावर आधारित लक्षवेधी पथनाट्य सादर करताना द्वितीय वर्ष छात्राध्यापक.




कार्यक्रमामध्ये आभार प्रकटीकरण करताना श्रीमती काजल पवार




कार्यक्रमाचे सूत्रसंचलन करताना श्री. रोहन भोईर


शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

बी. एड. वर्ष २०२४-२५

स्वच्छता ही सेवा अभियान-२०२५

कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले व सर्व प्राध्यापक वृंद |
| प्रास्ताविक व अतिथी परिचय | मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार |
| व्याख्यान:- पंडित दीनदयाळ उपाध्याय | श्रीमती.वर्षा आतकर |
| शासनाच्या विविध योजना | मा. श्री. दयानंद सिताराम मोकल |
| पथनाट्य | एकात्म मानव दर्शन – सर्वांचा विचार, सर्वांचे कल्याण |
| अध्यक्षीय मनोगत | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| सूत्रसंचालन | रोहन भोईर |
| आभार | काजल पवार |
| फोटोग्राफी आणि व्हिडीओ | सुजित सुरवसे<br>कल्पेश बरड |

स्थळ :-सरस्वती कक्ष दि.२५/०९/२०२५ वेळ :- ३.००


शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

बी. एड. वर्ष २०२४-२५

स्वच्छता ही सेवा अभियान-२०२५

निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, दिनांक - २५ सप्टेंबर २०२५ ,रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल येथे स्वच्छता ही सेवा अभियान कार्यक्रमांतर्गत दीनदयाळ उपाध्याय व विविध शासकीय योजनांची माहिती यावर आधारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

आयोजक
मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार

अध्यक्ष
मा. प्राचार्य. डॉ. रमा भोसले

प्रमुख वक्ता
मा. श्री. दयाराम सीताराम मोकल

प्रमुख उपस्थिती
मा. प्रा. बिजली दडपे
मा. प्रा डॉ. उज्वला डोणे
मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे

स्थळ :- सरस्वती कक्ष. वेळ :-३.००

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## जागतिक पर्यावरण आरोग्य दिन  कार्यक्रम अहवाल

### दिनांक – २६/०९/२०२५

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.  येथे स्वच्छता ही सेवा अभियान – २०२५ अंतर्गत '**जागतिक पर्यावरण आरोग्य दिन'** हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. यामध्ये भारतीय आहार व योग आरोग्याची काळजी या विषयावर विद्यार्थ्यांनी ICT द्वारे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयातील प्राध्यापक बिजली दडपे मॅडम यांनी भूषविले.

कार्यक्रमाची सुरुवात सूत्रसंचालन करणारे महेंद्र वाघ यांनी उपस्थितांच्या स्वागताने केली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. डॉ. निलिमा मोरे मॅडम, प्रा. डॉ. उज्वला  डोणे  मॅडम तसेच प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्राध्यापक  उपस्थित  होते.


या कार्यक्रमात द्वितीय वर्षाचे छात्राध्यापक यांनी विविध विषयावरील स्लाईड आणि व्हिडिओद्वारे सादरीकरण केले. त्यामध्ये श्री. आदर्श कांबळे यांनी आरोग्याची काळजी, श्रीम. नीलम शेलार यांनी भारतीय आहार, श्रीम. कार्तिकी सोनटक्के यांनी योग आणि भारतीय आहार-विहार, तसेच श्रीम.सुनीता डोळे यांनी आहार या विषयावर सादरीकरण केले. कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण महेंद्र वाघ यांनी केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन डॉ. उज्वला डोणे यांनी केले.







Rules and Regulations for the Computer Laboratory
GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
Old Mumbai Pune Highway Nh 48, Station Rd, Next To S.t. Bus Depot, Opp. Dr. Babasaheb Ambedkar Statue, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.98892° Long 73.11669°
26/09/2025 03:17 PM GMT +05:30
Google


शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल
GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
Old Mumbai Pune Highway Nh 48, Station Rd, Next To S.t. Bus Depot, Opp. Dr. Babasaheb Ambedkar Statue, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.988892° Long 73.11669°
26/09/2025 03:47 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
Old Mumbai Pune Highway Nh 48, Station Rd, Next To S.t. Bus Depot, Opp. Dr. Babasaheb Ambedkar Statue, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.988913° Long 73.11669°
26/09/2025 03:16 PM GMT +05:30
Google

## शासकीय अध्यापक महाविद्यालय , पनवेल

### शीर्षक'गडकिल्ले व हिंदवी स्वराज्य' व्याख्यान आणि 'महाराष्ट्रातील गड किल्ले हस्तलिखिताचे प्रकाशन'

## कार्यक्रम अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक २७ सप्टेबर,२०२५ रोजी

विश्व पर्यटन दिनानिमित्त "महाराष्ट्रातील गड किल्ले आणि हिंदवी स्वराज्य" या विषयावर श्री. निखिलेश देशमुख यांचे व्याख्यान तसेच" चला करूया सफर महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांची" या बी.एड्. द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रयत्नातून साकार हस्तलिखिताचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

शीर्षक' गडकिल्ले व हिंदवी स्वराज्य' व्याख्यान आणि 'महाराष्ट्रातील गड किल्ले हस्तलिखिताचे प्रकाशन'हा कार्यक्रम संपन्न झाला. यासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री निखिलेश देशमूख प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होते .विश्व पर्यटन दिनानिमित्त तसेच गडकिल्ल्यावर आधारित हस्तपुस्तिका प्रकाशनाचा एक विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. विश्व पर्यटन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या विशेषांक पुस्तिके मधील महाराष्ट्रातील गड किल्ल्यांची माहिती https://panvelbedcollege.org/wp-content/uploads/2025/10/Karuya-Safar-Maharashtratil-Gad-Killyanchi.pdf या लिंक द्वारे मिळू शकते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राध्यापक बिजली दडपे मॅडम यांनी भूषविले.

कार्यक्रमाची सुरुवात सूत्रसंचालकांनी उपस्थितांच्या स्वागताने केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व मार्गदर्शक प्राध्यापक बिजली दडपे मॅडम, या कार्यक्रमाचे प्रमूख अतिथी श्री निखिलेश देशमूख सर ,प्राध्यापक डॉ. निलिमा मोरे मॅडम, प्राध्यापक डॉ. उज्ज्वला डोणे मॅडम तसेच बी.एड प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्राध्यापक उपस्थित होते .प्राध्यापक डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख अतिथी श्री निखिलेश देशमुख सर यांचा परिचय करून दिला.

प्रास्ताविकात प्राध्यापक डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांनी या कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. या निमित्ताने गडकिल्ल्यांच्या ऐतिहासिक वारशावर आधारित तयार केलेल्या हस्तपुस्तिकेचे प्रकाशन करण्यात

आले. हस्तपुस्तिकेत गडकिल्ल्यांचे महत्व, पर्यटकांना उपयुक्त माहिती व संवर्धनाची आवश्यकता यावर विशेष माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात मुख्य व्याख्यान  कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री निखिलेश देशमूख सर यांनी दिले. त्यामध्ये त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची न्यायव्यवस्था ,लोकशाही, बुद्धिमत्ता व त्यांनी उभारलेले गडकिल्ले यावर प्रकाश टाकला. त्यांनी पर्यटनाचे आजच्या युगातील महत्व, गडकिल्ल्यांचे जतन, तसेच विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक पद्धतीने पर्यटनाचा आनंद घ्यावा यावर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणामधे प्राध्यापक बिजली दडवे मॅडम यांनी गडकिल्यांचे जतन , संवर्धन व पर्यटन संवर्धनाबाबत प्रेरणादायी संदेश दिला.

शेवटी उपस्थितांचे आभार श्रीमती ऋजुता म्हात्रे यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मनिषा पांचाळ यांनी प्रभावी पद्धतीने पार पाडले .

अशा प्रकारे विश्व पर्यटन दिन आणि गडकिल्ल्यांवरील हस्तपुस्तिका प्रकाशनाचा हा कार्यक्रम उत्साहात आणि शैक्षणिक वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## क्षणचित्रे : विश्व पर्यटन दिनानिमित्त - व्याख्यान आणि महाराष्ट्रातील गड किल्ले हस्तलिखित विशेषांक - प्रकाशन.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना श्रीमती. मनीषा पांचाळ.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. नीलिमा मोरे.




महाराष्ट्रातील गड किल्ले विषयक हस्तलिखित प्रकाशन.




व्याख्यान देताना प्रमुख वक्ते प्रा. निखिलेश देशमुख.




अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रा. बिजली दडपे.




आभार प्रकटीकरण करताना श्रीमती. ऋजुता म्हात्रे.

# शासकीय अध्यापक महाविद्यालय , पनवेल.

बी.एड्. वर्ष २०२४-२६

**‘स्वच्छता ही सेवा अभियान-२०२५’**

विश्व पर्यटन दिनानिमित्त व्याख्यान
आणि
हस्तलिखित विशेषांक -प्रकाशन

## निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात आनंद होतो की, दि.२७ सप्टेंबर २०२५ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे विश्व पर्यटन दिनानिमित्त प्रा. श्री. निखिलेश देशमुख यांच्या व्याख्यानाचे तसेच यानिमित्ताने “करूया सफर महाराष्ट्रातील गड किल्ल्यांची” या हस्तलिखित विशेषांकाचे प्रकाशन आयोजिले आहे, तरी या कार्यक्रमात आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

मा. प्रा. बिजली दडपे
आयोजक, मार्गदर्शक

मा.डॉ. रमा भोसले
प्राचार्य

दिनांक :२७/०९/२०२५
वेळ : ११ ते २

स्थळ : सरस्वती कक्ष

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

बी. एड. वर्ष २०२४-२६

## स्वच्छता ही सेवा अभियान-२०२५



## कार्यक्रम पत्रिका



| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन | मा. प्रा. बिजली दडपे मा. श्री.निखिलेश देशमुख व सर्व प्राध्यापक |
| प्रास्ताविक व प्रमुख वक्त्याचा परिचय | मा. प्रा.डॉ. नीलिमा मोरे |
| मुख्य वक्त्याचा सन्मान व सर्व मान्यवरांचे स्वागत | मा. अध्यक्ष व द्वितीय वर्ष छात्रध्यापक |
| हस्तलिखित विशेषांक प्रकाशन | प्रमुख अतिथी, अध्यक्ष व सर्व प्राध्यापक |
| व्याख्यान :- हिंदवी स्वराज्य आणि महाराष्ट्रातील गड किल्ले | मा. श्री. निखिलेश देशमुख |
| अध्यक्षीय मनोगत | मा. प्रा. बिजली दडपे |
| सूत्रसंचालन | मनीषा पांचाळ |
| आभार | ऋजुता म्हात्रे |
| राष्ट्रगीत | सर्व छात्रअध्यापक |
| फोटोग्राफी आणि व्हिडीओ | आकाश राठोड निमिष जाधव |

स्थळ :-सरस्वती कक्ष दिनांक :- २७/०९/२०२५ वेळ :-११ ते २

# अहवाल

## “स्वच्छता हीच सेवा अभियान 2025” अंतर्गत

## “शहीद भगतसिंग जयंती आणि आंतरराष्ट्रीय हृदय रोग दिवस”

दिनांक 29 सप्टेंबर 2025 रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे "स्वच्छता हीच सेवा अभियान 2025" अंतर्गत "शहीद भगतसिंग जयंती आणि आंतरराष्ट्रीय हृदयरोग दिवस" निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्रा. बिजली दडपे लाभल्या होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. मा. प्रा. बिजली दडपे यांच्या हस्ते माता सरस्वतीचे पूजन तसेच शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर विशेष सत्काराचा कार्यक्रम पार पडला. CCQC 2025 या अंतर्गत झालेल्या केस स्टडी प्रेझेंटेशन्समध्ये जनरल कॅटेगरीमधून 80 पेक्षा जास्त गुण मिळवून ‘ गोल्ड ट्रॉफी’ प्राप्त केली तसेच लेडीज स्पेशल या कॅटेगरीतून वबेस्ट प्रेझेंटेशन अवॉर्ड’ मिळवल्याबद्दल श्रीमती तनुश्री आठवले, श्रीमती अनघा म्हात्रे आणि श्रीमती स्मितल कुरूप या तीन प्रशिक्षणार्थी छात्राध्यापकांचा विशेष गौरव करण्यात आला.

तद्नंतर स्वागत व सन्मान या सत्रात बी. एड्. छात्राध्यापकांच्या हस्ते मा. प्रा. बिजली दडपे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद यांचा सन्मान करण्यात आला. पुढे कार्यक्रमाचे महत्त्व आणि उद्दिष्ट प्रास्ताविकातून श्रीमती निशा ब्राह्मणे यांनी सादर करून कार्यक्रमाचा हेतू व पार्श्वभूमी स्पष्ट केली.

तद्नंतर शहीद भगतसिंग यांच्या जीवनकार्यावरील व्याख्यान श्रीमती शोभा भांगे यांनी केले. त्यांनी भगतसिंगांचे क्रांतिकारी विचार, त्यांचे बलिदान आणि त्यांच्या जीवन प्रवासावर प्रकाश टाकला. त्यानंतर श्रीमती स्वाती घोरपडे यांनी "माझा साक्षात्कारी हृदयरोग" या ग्रंथाचे परीक्षण करून उपस्थितांना साहित्यिक जाणिवांचा सखोल अनुभव दिला. जागतिक हृदयरोग दिनानिमित्त "माझा साक्षात्कारी हृदयरोग" या डॉ .अभय बंगांच्या ग्रंथाचे परीक्षण सादर करण्यामागे वेगाने वाढत जाणाऱ्या हृदयरोगाविषयी छात्रा-अध्यापकांमध्ये जाणिवा विकसित करणे, आणि योग्य ती खबरदारी घेऊन निरामय स्वास्थ्य लाभ हा होता. याकरिता या विषयांवर आधारित निबंध स्पर्धेचे आयोजनही या कार्यक्रमाला जोडूनच करण्यात आले. तद्नंतर कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. प्रा. बिजली दडपे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. त्यांनी शहीद भगतसिंगांचे प्रेरणादायी जीवन, स्वच्छतेचे सामाजिक व शैक्षणिक महत्त्व तसेच प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्याची जबाबदारी यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या समारोपासाठी आभार प्रकटीकरण श्रीमती सोनाली शिरसाठ यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन श्री. रोहन भोईर यांनी प्रभावीपणे केले.

शहीद भगतसिंग जयंतीनिमित्त आयोजित हा विशेष कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण, शैक्षणिक तसेच प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल**

## "स्वच्छता ही सेवा 2025" उपक्रमांतर्गत "जागतिक हृदय रोग दिन आणि शाहिद भगतसिंग जयंती"








कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन करताना मा. अध्यक्ष प्रा. बिजली दडपे

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्रीमती निशा ब्राह्मणे




"CCQC 2025 मध्ये महाविद्यालयाचा मान वाढवणारे विजेते तनुश्री , अनघा, आणि स्मितल यांचा सत्कार करताना मा. प्रा. बिजली दडपे

शहीद भगतसिंग यांच्या जीवनातील विविध प्रसंग व्याख्यानातून सांगताना श्रीमती शोभा भांगे







माझा साक्षात्कारी हृदयरोग या पुस्तकाचे परीक्षण व्याख्यान रुपाने सादर करताना श्रीमती स्वाती घोरपडे

कार्यक्रमांमध्ये अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा. प्रा. बिजली दडपे.




आभार प्रकटीकरण करताना श्रीमती सोनाली शिरसाठ




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना श्री. रोहन भोईर.



शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल
बी.एड.वर्ष २०२४-२६
स्वच्छता ही सेवा अभियान-२०२५
कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन | मा. प्रा. बिजली दडपे व सर्व प्राध्यापक वृंद |
| स्वागत व सन्मान | मा. प्रा. बिजली दडपे व सर्व प्राध्यापक वृंद |
| प्रास्ताविक | श्रीमती निशा ब्राम्हणे |
| शहीद भगतसिंह जयंती व्याख्यान | श्रीमती शोभा भांगे |
| ग्रंथ परीक्षण - माझा साक्षात्कारी हृदयरोग | श्रीमती स्वाती घोरपडे |
| अध्यक्षीय मनोगत | मा. प्रा. बिजली दडपे |
| सूत्रसंचालन | श्री. रोहन भोईर |
| आभार प्रकटीकरण | श्रीमती सोनाली शिरसाठ |
| समारोप | वन्दे मातरम् |
| फोटोग्राफी आणि व्हिडिओ | श्री. निमिष जाधव, श्री.आकाश राठोड |

स्थळ - सरस्वती कक्ष
दिनांक - २९/०९/२०२५ वेळ - दुपारी०३:००



शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.
बी. एड. द्वितीय वर्ष २०२४-२६
स्वच्छता ही सेवा अभियान-२०२५
निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, दिनांक - २९सप्टेंबर २०२५ ,रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल येथे स्वच्छता ही सेवा अभियान -२०२५ कार्यक्रमांतर्गत शहीद भगत सिहं जयंती निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.


प्रमुख वक्त्या
१) श्रीमती. शोभा भांगे , २) श्रीमती स्वाती घोरपडे

अध्यक्ष
मा. प्रा.बिजली दडपे

प्रमुख उपस्थिती
मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे
मा. प्रा डॉ. उज्वला डोणे

स्थळ :- सरस्वती कक्ष.
वेळ :-३ ते ५

कार्यक्रम पत्रिका आणि निमंत्रण पत्रिका




“स्वच्छता ही सेवा अभियान २०२५” अंतर्गत आयोजित निबंध स्पर्धेत स्वच्छता, पोषण आणि आरोग्य यावर छात्र- अध्यापकांचे चिंतन.




कार्यक्रमाचे फलक लेखन

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे “स्वच्छता ही सेवा अभियान २०२५” उत्साहात संपन्न.

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे बी. एड. द्वितीय वर्ष (२०२४-२६) च्या विद्यार्थी-शिक्षकांतर्फे दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी “स्वच्छता ही सेवा अभियान २०२५” या राष्ट्रीय उपक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या सरस्वती कक्षामध्ये सकाळी ११:१५ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमाचा मुख्य हेतू महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणे हा होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या माननीय प्राध्यापिका बिजली दडपे यांनी विराजमान होऊन कार्यक्रमाला उंची प्राप्त करून दिली, तर या संपूर्ण उपक्रमाची धुरा आयोजिका म्हणून माननीय प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांनी यशस्वीपणे सांभाळली. याप्रसंगी, प्रा. डॉ. उज्वला डोणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली, ज्यामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करून झाली. अध्यक्षा प्रा. दडपे मॅडम आणि उपस्थित सर्व प्राध्यापक वृंदांच्या शुभहस्ते महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस वंदन करण्यात आले. यानंतर, याच मान्यवरांच्या हस्ते स्वच्छता अभियानाच्या बॅनरचे अनावरण करून या मोहिमेला औपचारिक सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे मान्यवरांचा स्वागत समारंभ. याप्रसंगी, अध्यक्षा मा. प्रा. बिजली दडपे यांचे स्वागत आयोजिका प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांनी केले, तर आयोजिका प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांचे स्वागत प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी प्रीती सकपाळ हिने केले. तसेच, प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ. उज्वला डोणे यांचे स्वागत विद्यार्थिनी सुनिता डोळे हिने केले.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांचा सक्रिय आणि नियोजनबद्ध सहभाग. कुमारी रुणाली कचरे हिने आपल्या प्रभावी वाणीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या आकर्षक निमंत्रण पत्रिका आणि कार्यक्रम पत्रिकेची निर्मिती श्रीमती. प्रीती सकपाळ यांनी केली, तर कार्यक्रमाच्या प्रत्येक क्षणाचे सुंदर छायाचित्रण आणि व्हिडिओग्राफीची जबाबदारी श्री. जॉकी वाघमारे आणि श्री. श्रीराम फुफाने यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडली. या संपूर्ण आयोजनातून विद्यार्थ्यांच्या संघटन कौशल्याचे आणि सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेचे उत्तम दर्शन घडले.




प्रतिमा पुष्प अर्पण करतात कार्यक्रम अध्यक्षा मा.प्रा. बिजली दडपे.




मा. प्राध्यापक बिजली दडपे मॅडम यांचे स्वागत करताना आयोजिका डॉ. नीलिमा मोरे मॅडम.




स्वच्छता अभियान भारत -२०२५ बॅनर अनावरन करताना प्राध्यापक वंद.




अध्यक्षीय भाषण करताना प्राध्यापक डॉ बिजली दडपे मॅडम.




कार्यक्रमात आलेल्या प्रमुख पाहुण्या डॉ. उज्वला डोने मॅडम याचें स्वागत करताना श्रीमती. अक्सा खान व सूत्रसंचालन करताना श्रीमती. रुणाली कचरे.




कार्यक्रमाचे आभार मानताना श्रीमती. मोहिनी भगत मॅडम.



प्रा.डॉ. नीलिमा मोरे मॅडम विद्यार्थांना मार्गदर्शन करताना.




कार्यक्रमाचे शुभारंभ करताना काढण्यात आलेली रॅली




एसटी स्टँड जवळ साफसफाई करताना प्रशिक्षणार्थी.




महाविद्यालयचा परिसर स्वच्छ करताना विध्यार्थी



स्वच्छता करताना विद्यार्थी व निरीक्षण करताना प्राध्यापक वृंद



शासकीय अध्यापक महाविद्यालय,
पनवेल.
बी. एड. द्वितीय वर्ष २०२४-२६

“स्वच्छता ही सेवा अभियान-२०२५”

निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, दिनांक 3 ऑक्टोंबर 2025 शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे स्वच्छता ही सेवा अभियान 2025 कार्यक्रमांतर्गत एस. स्टॅड ठिकाणी स्वच्छता कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

आयोजक
मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे

अध्यक्ष
मा. प्रा. बिजली दडपे

प्रमुख उपस्थिती
मा. प्रा डॉ. उज्वला डोणे

स्थळ :- सरस्वती कक्ष.
वेळ :- ११.१५

**निमंत्रण पत्रिका**



शासकीय अध्यापक महाविद्यालय,
पनवेल.
बी. एड. वर्ष २०२४-२६

स्वच्छता ही सेवा अभियान-२०२५
सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता कार्यक्रम
कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता कार्यक्रम. सरस्वती पूजन व महात्मा गांधी जयंती, लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस अभिवादन. | मा. प्राध्यापक दडपे मॅडम व सर्व प्राध्यापक वृंद |
| म. गांधी जयंती निमित्त सार्वजनिक ठिकाणी स्वच्छताकार्यक्रम बॅनरचे अनावरण. | मा. प्राध्यापक दडपे मॅडम व सर्व प्राध्यापक वृंद |
| मा. प्रा. बिजली दडपे यांचे स्वागत | प्रा. डॉ . नीलिमा मोरे |
| प्राध्यापक डॉ. नीलिमा मोरे यांचे स्वागत | प्रीती सकपाळ |
| प्रा. डॉ. उज्वला डोणे यांचे स्वागत | सुनिता डोळे |
| सूत्रसंचालन | ऋणाली कधरे |
| आभार | |
| फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी | जॉकी वाघमारे व श्रीराम फुफाने |
| कार्यक्रम पत्रिका व निमंत्रण पत्रिका | प्रीती सकपाळ |

स्थळ :- सरस्वती कक्ष
दिनांक :- ३/१०/२५
वेळ :- ११.१५

**कार्यक्रम पत्रिका**